Back



## सारांश

**केळी उत्पादकांच्या मदतीसाठी बैठक**
नवी दिल्ली : अवकाळी पाऊस आणि वादळामुळे जळगाव तसेच नंदुरबार जिल्ह्यातील केळी उत्पादकांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी पीक विमा भरपाई मिळावी यासाठी क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी कृषी मंत्रालय आणि ॲग्रिकल्चर इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया यांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.

# 'बाई' नावाच्या रंगपर्वाचा अस्त

## आदरांजली

रंगभूमीचे चालते-बोलते विद्यापीठ, आधुनिक मराठी रंगभूमीच्या प्रवर्तक आणि अनेक दिग्गज कलाकार घडवणाऱ्या 'बाई' अर्थात प्रतिभावंत रंगकर्मी विजया मेहता यांच्या निधनाने एका देदीप्यमान रंगपर्वाचा अस्त झाला. विजयाबाई आज आपल्यात नसल्या तरी त्यांनी मराठी रंगभूमीच्या मातीत पेरलेले प्रयोगांचे बीज पिढ्यान्-पिढ्या सुवर्णफळे देत राहील.



मराठी नाटक आणि समांतर सिनेमा जगताला एक नवी दिशा देणाऱ्या ज्येष्ठ कलाकार विजया मेहता यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९३४ रोजी गुजरातमधील बडोदा येथे झाला. विजया यांचे पूर्वाश्रमीचे नाव विजया जयवंत होते. त्यांच्या कुटुंबाचा हिंदी चित्रपटसृष्टीशी खूप जवळचा संबंध होता. प्रसिद्ध अभिनेत्री नलिनी जयवंत त्यांच्या आत्या होत्या, तर शोभना समर्थ, नूतन आणि तनुजा या त्यांच्या चुलत बहिणी होत्या. पुढे जुन्या काळातील महान अभिनेत्री दुर्गा खोटे यांचे सुपुत्र हरीन खोटे यांच्याशी त्यांचा विवाह झाला.

इतके ग्लॅमरस वातावरण आजूबाजूला असतानाही विजयाबाईंनी हिंदी चित्रपटांच्या चकचकाटात न अडकता मराठी नाटकाची वाट निवडली. हा निर्णय मराठी रंगभूमीचे नशीब बदलणारा ठरला. लग्नानंतर अवघ्या पाच वर्षांत पती हरीन खोटे यांचे निधन झाले. पदरात दोन लहान मुले असताना आलेल्या या मोठ्या आघाताने त्या खचल्या नाहीत. त्यांनी कंबर कसली आणि त्या पुन्हा उभ्या राहिल्या. पुढे फरोख मेहता यांच्याशी पुनर्विवाह करून त्यांचा संसार स्थिरस्थावर झाला. त्यांनी दिल्लीत इब्राहिम अल्काझी आणि मुंबईत आदी मर्झबान यांच्यासारख्या दिग्गजांकडून नाट्यकलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले होते, ज्याचा उपयोग त्यांनी मराठी नाटकांचा चेहरा बदलण्यासाठी केला. साठ आणि सत्तरच्या दशकात विजयाबाईंनी प्रस्थापित संकेतांची चौकट मोडीत काढली. विजय तेंडुलकर, सी. टी. खानोलकर, महेश एलकुंचवार यांसारख्या नव्या दमाच्या लेखकांची नाटके मंचावर आणण्यासाठी त्यांनी डॉ. श्रीराम लागू, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे, माधव वाटवे यांच्या सोबतीने 'रंगायन' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेने मराठी नाटकांमध्ये प्रयोगशीलतेला प्राधान्य दिले आणि एक चोखंदळ प्रेक्षकवर्ग तयार केला. पुढे त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवरही तितक्याच ताकदीने प्रवेश केला आणि तिथले गणितही बदलून दाखवले. पाश्चात्त्य रंगमंचावरील उत्तम विचार मराठीत आले पाहिजेत, या विचाराने त्यांनी बर्टोल्ट ब्रेख्त यांच्या नाटकाचे 'अजब न्याय वर्तुळाचा' आणि आयनेस्कोच्या नाटकाचे 'खुर्च्या' या नावांनी रूपांतर केले.

विजयाबाईंनी दिग्दर्शनाची स्वतःची एक स्वतंत्र शैली निर्माण केली. त्यांच्या हाताखाली जडणघडण झालेले कलाकार आज अभिनय क्षेत्राचे राजे मानले जातात. विक्रम गोखले, नाना पाटेकर, रीमा लागू, भक्ती बर्वे, प्रदीप वेलणकर, सुकन्या कुलकर्णी, नीना कुलकर्णी यांसारख्या दिग्गज नटांची फौज विजयाबाईंच्या शिस्तीतून आणि तालमीतून तयार झाली होती. 'एन.सी.पी.ए.'सारख्या मोठ्या संस्थेचे संचालकपद त्यांनी तब्बल १७ वर्षे सांभाळले. 'बॅरिस्टर'मधील केशवपन केलेली मावशी असो, 'हमीदाबाईची कोठी'मधील हमीदाबाई असो, की 'वाडा चिरेबंदी'मधील विधवा आई असो; विजयाबाईंनी अभिनयात नेहमीच प्राण ओतला. संवादातील लय, शब्दांमधील योग्य विराम आणि चेहऱ्यावरील अस्सल हावभाव याच्या जोरावर त्या प्रत्येक व्यक्तिरेखा जिवंत करत असत. चित्रपट क्षेत्रातही त्यांनी 'पेस्तनजी', 'रावसाहेब', आणि 'स्मृतिचित्रे' यांसारख्या कलाकृतींमधून आपल्या दिग्दर्शनाचा ठसा उमटवला. त्यांना संगीत नाटक अकादमी पुरस्कार, कालिदास सन्मान आणि राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारासह अनेक प्रतिष्ठित सन्मान मिळाले होते. त्यांच्या एकूणच जीवनप्रवासाची सुंदर गाथा त्यांच्या 'झिम्मा : आठवणींचा गोफ' या आत्मचरित्रात वाचायला मिळते. विजयाबाई आज आपल्यात नसल्या तरी त्यांनी मराठी रंगभूमीच्या मातीत पेरलेले प्रयोगांचे बीज पिढ्यानपिढ्या सुवर्णफळे देत राहील.

## ज्येष्ठ रंगकर्मी विजया मेहता कालवश

पान १ वरून

वेगळाच वस्तुपाठ घालून दिला. मराठी नाट्यविश्वात अत्यंत आदराने आणि मायेने 'बाई' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विजया मेहता यांनी १९६०च्या दशकात मराठी रंगभूमीला व्यावसायिक साच्यातून बाहेर काढत प्रायोगिक व समांतर चळवळीचे नेतृत्व केले.

नाट्यविश्वाप्रमाणेच त्यांनी रुपेरी पडद्यावरही आपल्या प्रतिभेची मोहर उमटवली. 'स्मृती चित्रे', 'रावसाहेब', 'पेस्तनजी' आणि 'हवेली बुलंद थी' यांसारख्या वास्तववादी आणि सामाजिक भान जपणाऱ्या चित्रपटांचे त्यांनी दिग्दर्शन केले. केवळ दिग्दर्शनच नव्हे, तर 'कलियुग', 'पार्टी', 'रावसाहेब' आणि 'क्वेस्ट' या समांतर चित्रपटांमध्ये त्यांनी साकारलेल्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. भारतीय कलाविश्वातील त्यांच्या योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. १९७५ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळाला. १९८६ मध्ये 'रावसाहेब' चित्रपटासाठी 'सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री'चा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसेच झी गौरव जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विजयाबाईंच्या जाण्याने केवळ एक दिग्दर्शिका किंवा अभिनेत्री नव्हे, तर अनेक पिढ्यांना अभिनयाचे आणि दिग्दर्शनाचे धडे देणारी एक प्रयोगशील 'शाळा' हरपली आहे, अशी भावना कलाक्षेत्रातून व्यक्त होत आहे.

# विहानसोबत सकाळीच क्रिकेट खेळलो...

## क्रीडा प्रशिक्षक धनश्री यांनी जागवल्या आठवणी

**भाग्यश्री भुवड : सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. ३० : शाळेतून घरी परतत असताना शाळेच्या बसवर झाड कोसळल्याने ११ वर्षीय विहान गौरव श्रीवास्तव याचा मृत्यू झाला. या घटनेने चेंबूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आज क्रिकेटचा तास होता. आमच्यासोबत तो मैदानावर क्रिकेट खेळला आणि आता तो आपल्यात नाही, यावर विश्वास ठेवणे कठीण असल्याचे त्याच्या क्रीडा प्रशिक्षक धनश्री राव-राणे यांनी सांगितले.

विहान युनिव्हर्सल हायस्कूलमध्ये इयत्ता सहावीत शिकत होता. मंगळवारी त्याचा क्रिकेटचा तास होता आणि तो प्रशिक्षकांसोबत आनंदाने खेळला होता. शाळा सुटल्यानंतर नेहमीप्रमाणे तो इतर विद्यार्थ्यांसह घरी जाताना अचानक पिंपळाचे झाड शाळेच्या बसवर कोसळले. या घटनेत विहान गंभीर जखमी झाला. त्याला तत्काळ झेन रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र तत्पूर्वीच त्याची प्राणज्योत मालवल्याचे झेन रुग्णालयाचे संचालक डॉ. रॉय पाटणकर यांनी सांगितले.

विहानची आई जुही श्रीवास्तव या एका खासगी कंपनीत कार्यरत आहेत. दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास जुही यांना मुलाचा अपघात झाल्याची माहिती मिळाली. त्यानंतर आम्ही तातडीने रुग्णालय गाठल्याचे त्यांच्या सहकारी बीबी कालरा यांनी सांगितले. विहान हा अत्यंत हुशार, निरागस आणि सर्वांचा लाडका विद्यार्थी होता. या घटनेने संपूर्ण शाळा हादरली असून शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांवर दुःखाचा आघात झाला असल्याचे युनिव्हर्सल स्कूलच्या प्रभारी दर्शिका मेहता यांनी सांगितले.

### बसमधून बाहेर पडताच येत नव्हते

आम्ही १२ विद्यार्थी बसमध्ये घरी जात होतो. अचानक आमच्या बसवर झाड कोसळले. आम्ही सगळे खूप घाबरलो आणि मदतीसाठी ओरडू लागलो, कारण आम्हाला बसमधून बाहेर पडता येत नव्हते. त्यानंतर कोणीतरी बसचा मागील दरवाजा उघडला आणि आम्हाला सुरक्षित बाहेर काढले, असे जखमी विद्यार्थिनी क्रीषा रॉय हिने सांगितले.

# हा प्रशासनाच्या निष्काळजीचा बळी : अनिल गर्ग

मुंबई, ता. ३० : शाळकरी विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या बसवर झाड कोसळल्याची घटना केवळ 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. महापालिकेच्या वृक्ष देखभालीतील ढिसाळ कारभार आणि सार्वजनिक सुरक्षेबाबतच्या निष्काळजीमुळेच हा अपघात घडला आहे, असा थेट आरोप 'स्कूल बस ओनर्स असोसिएशन'चे अध्यक्ष अनिल गर्ग यांनी केला.

दरवर्षी मॉन्सूनपूर्व वृक्ष तपासणी आणि धोकादायक झाडांच्या सर्वेक्षणाच्या केवळ घोषणा होतात, मग प्रत्यक्ष अंमलबजावणी का होत नाही? जुन्या वृक्षांची वेळेत छाटणी झाली होती का? आणि मुंबईत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करताना जुन्या वृक्षांच्या मुळांना धक्का लागल्याने ते कमकुवत झाले आहेत का? या सर्व बाबींची सखोल व उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी मागणी गर्ग यांनी केली आहे.

# ठाकरेंना पुन्हा धक्का

पान १ वरून

फुटण्याची चर्चा असताना विधान परिषदेतील सचिन अहिर यांना आपल्याकडे खेचण्यात शिंदेंना यश मिळाले आहे. विधान परिषदेच्या उपसभापतिपदासाठी उद्या (ता. १) निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी महायुतीच्या वतीने नाट्यमयरित्या सचिन अहिर यांनी अर्ज भरला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार उपस्थित होते.

शिवसेनेकडून अहिर यांच्या उमेदवारीविषयी प्रचंड गोपनीयता पाळण्यात आली होती. अर्ज भरण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या दालनात दाखल होईपर्यंत ठाकरे गटाला किंवा महाविकास आघाडीच्या नेत्यांना शिंदेंच्या खेळीची कोणतीही कल्पना नव्हती. सचिन अहिर शिंदेंच्या गोटात दाखल झाल्याची बातमी ही ठाकरेंच्या पक्षाच्या बहुतांश आमदारांना प्रसार माध्यमांद्वारेच समजली.

अहिर यांनी आपल्या निर्णयाविषयी शेवटपर्यंत पक्ष नेतृत्वाला अंधारात ठेवल्याने ठाकरे गटाच्या नेत्यांना नेमकी काय प्रतिक्रिया द्यावी हे समजत नव्हते. सचिन अहिर यांनी आदित्य ठाकरे यांना सकाळी मोबाईलवर मेसेज करून ते पक्ष सोडत असल्याचे कळविल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## ठाकरेंकडून अभ्यंकर यांना संधी

उपसभापतिदाच्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे पक्षाकडून मुंबई शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधी ज. मो. अभ्यंकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. विधान परिषदेत महायुतीचे स्पष्ट बहुमत आहे. त्यामुळे अभ्यंकर यांचा निभाव लागणे कठीण दिसत आहे.

## अंबादास दानवे यांना संदेश

सचिन अहिर यांनी आपल्या निर्णयाची कुणालाही कुणकुण लागणार नाही याची खबरदारी घेतली होती. सकाळी ११ वाजेपर्यंत ते ठाकरेंच्या पक्षाच्या आमदारांसोबतच होते. मात्र, सकाळी ११.३०च्या दरम्यान त्यांनी अंबादास दानवे यांना मोबाईलवर इंग्रजीत संदेश पाठवला. त्यात त्यांनी आपल्या निर्णयाची माहिती दिली. दानवे यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना अहिर यांचा संदेश वाचून दाखवला.



कोणाला किती महत्त्व द्यायचे, याबद्दल आमच्या वरिष्ठांनी आत्मचिंतन करायला हवे. वरळीतील शिवसैनिक स्थिर आहे. येणारी कुठलीही निवडणूक असो उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनाच यशस्वी होईल.
- सुनील शिंदे, आमदार, ठाकरे गट


दोन दिवसीय

**स्वीय सहायक (PA) प्रशिक्षण**
**(पर्सनल असिस्टंट)**

लोकप्रतिनिधींच्या स्वीय सहाय्यक (Personal Assistant) म्हणून प्रभावीपणे काम करण्यासाठी आवश्यक कौशल्ये, प्रशासनाशी समन्वय तसेच मतदारसंघ व्यवस्थापन याबाबत सखोल मार्गदर्शन देणारे विशेष प्रशिक्षण.

**प्रशिक्षणात काय शिकाल?**
- स्वीय सहाय्यक (PA) चे महत्त्व, संधी व आव्हाने
- स्वीय सहायकाची (PA) ची कर्तव्ये व जबाबदाऱ्या
- महाराष्ट्र विधानमंडळाच्या कामकाजाचा परिचय
- मतदारसंघाचा अभ्यास व व्यवस्थापन
- सोशल मीडियाचा प्रभावी वापर कसा करावा
- शासन व प्रशासनाशी संपर्क व समन्वय
- शासकीय व अशासकीय योजनांची माहिती
- वेळेचे प्रभावी नियोजन (PA साठी अत्यंत महत्त्वाचे)
- लोकप्रतिनिधींच्या स्वीय सहाय्यक (PA) कडून अपेक्षा
- कार्यालय भेट व प्रत्यक्ष कामकाजाची माहिती

प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर SIILC चे प्रमाणपत्र मिळेल.

**कोणासाठी उपयुक्त?**
- पदवीधर (Graduation) उमेदवार
- MPSC / UPSC चे इच्छुक विद्यार्थी
- राजकीय क्षेत्रात करिअर करू इच्छिणारे
- लोकप्रतिनिधींसोबत PA म्हणून काम करण्याची इच्छा असलेले

अधिक माहितीसाठी सोबत दिलेला QR Code स्कॅन करा.
व्हॉट्सअप ग्रुप जॉईन करण्यासाठी सोबत दिलेला QR Code स्कॅन करा.

अधिक माहितीसाठी संपर्क : ८४८४८११५४४ / ८९५६३४४४७२ / ८९५६३४४४७१

SIILC Transforming Human Capital | Powered by सकाळ Print | TV | Digital | Events
दिनांक : ४ जुलै आणि ५ जुलै २०२६
वेळ : सकाळी १०:३० ते सायं. ५:३०
website: www.siilcedu.in

ठिकाण : SIILC सकाळ मिडिया सेंटर, सकाळ नगर, गेट नं. १, बाणेर रोड, औंध, पुणे
SIMACES | company/simaces-learning-llp | simaces_siilc | simaces learning llp



**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**
**उप प्रादेशिक कार्यालय, तारापुर - २**
**पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना**

मे. जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथोरिटी (जेएनपीए) हे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, महाराष्ट्र राज्य यांच्या बरोबर वाढवण, ता. डहाणू, जि. पालघर येथे बंदर विकसित करीत आहेत. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी व बांधकामासाठी लागणारे दगड/खडक उत्खननासाठी खालील प्रस्तावित ठिकाणी दगड खाण प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी घेण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे विनंती अर्ज प्राप्त झाले आहेत.

१. गारगांव दगडखाण प्रकल्प, गट क्र. ८२ (भाग), भाडेपट्टा क्षेत्र २४.९४ हे. मौजे गारगांव, ता.जि. पालघर. खाणकाम क्षेत्र–२४.९४ हे., खाणकाम/उत्पादन ४०१००३५ मे.टन/वर्ष
२. गारगांव दगडखाण प्रकल्प, गट क्र. ८२ (भाग), भाडेपट्टा क्षेत्र १७.०८ हे. मौजे गारगांव, ता.जि. पालघर. खाणकाम क्षेत्र–१७.०८ हे., खाणकाम/उत्पादन ३६०८७६४ मे.टन/वर्ष
३. खानीवडे दगडखाण प्रकल्प, गट क्र. ९ (भाग), भाडेपट्टा क्षेत्र १५.३९ हे. मौजे खानीवडे, ता.जि. पालघर. खाणकाम क्षेत्र–१५.३९ हे., खाणकाम/उत्पादन २५८५५५३ मे.टन/वर्ष

प्रकल्प प्रवर्तकाच्या विनंतीनुसार आणि राज्यस्तरीय मुल्यांकन तज्ञ समिती **(State Level Expert Appraisal Committee (SEAC))** अनुक्रमे ToR (१) क्र. TO26B0108MH5581103N (दि. २५.०४.२०२६), ToR (२) क्र. TO26B0108MH5341451N (दि. २५.०४.२०२६) व ToR (३) क्र. TO26B0108MH5883916N (दि. २५.०४.२०२६) नुसार वरील दगड खाण प्रकल्पांसाठी पर्यावरणीय दृष्टिकोनातून जनसुनावणी आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रस्तावित प्रकल्पाकरिता भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४.०९.२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियमांन्वये व ०१.१२.२००९ च्या सुधारीत अधिनियमांन्वये सदर प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक मुद्दयांबाबत घेण्यात येत असून सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरातील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पासंबंधी टिका–टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येईल.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका–टिप्पणी तसेच आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसूनावणीच्या दिनांकापर्यंत खालील पत्यावर नोंदविण्यात याव्यात.

उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर–२
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
एम.आय.डी.सी., कॉलनी परिसर, पोस्ट–टी.ए.पी.एस, बोईसर (प),
ता. व जि.–पालघर– ४०१ ५०४
ई–मेल : srotarapur2@mpcb.gov.in आणि rothane@mpcb.gov.in

मौखिक सुचना, विचार, टिका–टिप्पणी तसेच आक्षेप जाहिर जनसुनावणीच्या वेळेस सुध्दा नोंदविता येईल. जाहिर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल:

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | : | गारगांव दगडखाण प्रकल्प, गट क्र. ८२ (भाग), भाडेपट्टा क्षेत्र २४.९४ हे. मौजे गारगांव, ता.जि. पालघर. खाणकाम क्षेत्र–२४.९४हे., खाणकाम/उत्पादन ४०१००३५मे.टन/वर्ष |
| दिनांक | : | ०२/०८/२०२६ वेळ :सकाळी १०:०० वाजता |
| स्थळ | : | जीवन शिक्षण संस्थेचे अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळेचे खुले मैदान, शिगांव (खुताड), बोईसर– शिगांव रोड, ता.जि. पालघर |

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | : | गारगांव दगडखाण प्रकल्प, गट क्र. ८२ (भाग), भाडेपट्टा क्षेत्र १७.०८ हे. मौजे गारगांव, ता.जि. पालघर. खाणकाम क्षेत्र–१७.०८हे., खाणकाम/उत्पादन ३६०८७६४मे.टन/वर्ष |
| दिनांक | : | ०२/०८/२०२६ वेळ : दुपारी ०१:३० वाजता |
| स्थळ | : | जीवन शिक्षण संस्थेचे अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळेचे खुले मैदान शिगांव (खुताड), बोईसर– शिगांव रोड, ता.जि. पालघर |

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | : | खानीवडे दगडखाण प्रकल्प, गट क्र. ९ (भाग), भाडेपट्टा क्षेत्र १५.३९ हे. मौजे खानीवडे, ता.जि. पालघर. खाणकाम क्षेत्र–१५.३९हे., खाणकाम/उत्पादन २५८५५५३मे.टन/वर्ष |
| दिनांक | : | ०२/०८/२०२६ वेळ दुपारी ०४:३० वाजता |
| स्थळ | : | जीवन शिक्षण संस्थेचे अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळेचे खुले मैदान, शिगांव (खुताड), बोईसर– शिगांव रोड, ता.जि. पालघर |

पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA Report) अहवाल / पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) आणि प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये असलेल्या कार्यकारी सारांशाच्या इंग्रजी आणि मराठी मधील प्रती अशा दोन्ही भाषांमध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदरील दस्तावेज अभ्यासू शकतील.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
२. पर्यावरण वने आणि हवामान बदल मंत्रालय, झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, नवीन सेक्रेटरी ईमारत, तळ मजळा, पुर्व विंग, सिव्हील लाईन, नागपूर–४४०००१
३. जिल्हाधिकारी पालघर, पालघर बोईसर रोड, कोळगांव, ता.जि. पालघर
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर, पालघर बोईसर रोड, कोळगांव, ता.जि. पालघर
५. सह–संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई – ४०० ०२२
६. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ५ वा मजला, ऑफिस कॉम्प्लेक्स बिल्डींग, मुलुंड चेकनाक्याजवळ, वागळे इस्टेट, ठाणे–४०० ६०४.
७. उप–विभागीय दंडाधिकारी पालघर पालघर बोईसर रोड, कोळगांव, ता.जि. पालघर
८. मुख्य प्रबंधक, जिल्हा उद्योग केंद्र, मध्यवर्ती कार्यालय, जि. पालघर
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, ३ रा मजला, ऑफिस कॉम्प्लेक्स बिल्डींग, मुलुंड चेकनाक्याजवळ, वागळे इस्टेट, ठाणे–४०० ६०४.
१०. तहसिलदार, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती, कचेरी रोड, ता. पालघर, जि. पालघर
११. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कचेरी रोड, ता. पालघर, जि. पालघर
१२. उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर–२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, एम.आय.डी.सी., कॉलनी परिसर, पोस्ट–टी.ए.पी.एस, बोईसर (प), ता. व जि.–पालघर– ४०१ ५०४
१३. ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत गारगांव– खानिवडे तालुका व जिल्हा पालघर
१४. ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत रावते, तालुका व जिल्हा पालघर
१५. ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत शिगांव– सुमडी, तालुका व जिल्हा पालघर
१६. ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत महागांव– वाळवे, तालुका व जिल्हा पालघर
१७. ग्राम विकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत चिंचारे, तालुका व जिल्हा पालघर

सही/–
(रा.रा.वसावे)
उप–प्रादेशिक अधिकारी, तारापूर–२, म.प्र.नि.मंडळ, तारापूर



Mahindra LIFESPACES

**महिंद्रा लाईफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय : ४ था मजला, ए विंग, महिंद्रा टॉवर्स, डॉ. जी.एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१८.
दूरध्वनी : ०२२ - ६७४७८६०० ई-मेल : investor.mldl@mahindra.com संकेतस्थळ : www.mahindralifespaces.com
कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर : L45200MH1999PLC118949

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंग / इतर दृकश्राव्य माध्यम आणि इलेक्ट्रॉनिक मतदानाद्वारे होणाऱ्या २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, महिंद्रा लाईफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेडची (दि कंपनी) २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (२७ वी एजीएम किंवा एजीएम) गुरूवार २३ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.३० वा. (भाप्रवे) कंपनी कायदा, २०१३ ('दि अॅक्ट') च्या लागू तरतुदीसह अनुपालनामध्ये व्हिडिओ कॉन्फरन्स (VC)/ इतर दृकश्राव्य माध्यमाद्वारे (OAVM) होण्याचे नियोजित आहे, दि सिक्युरिटिज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट) नियमन २०१५ ('लिस्टिंग रेग्युलेशन्स')

अंतर्गत नियमांसह वाचावा, मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सद्वारे ('MCA') जारी परिपत्रके आणि सिक्युरिटिज एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) नुसार एजीएमच्या सूचनेमध्ये स्थापित व्यवसायाचे व्यवहार करण्यासाठी VC/OAVM सुविधेद्वारे एजीएमचे आयोजन करण्यास परवानगी मिळाली आहे.

कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय येथे एजीएमचे प्रोसिडिंग्ज आयोजित केल्याचे मानण्यात येईल. सभासद फक्त VC/ OAVM सुविधेद्वारे २७ व्या एजीएममध्ये उपस्थित आणि सहभागी होऊ शकतील. कायद्याचे कलम १०३ अंतर्गत कोरम गणनेच्या हेतूसाठी VC/ OAVM द्वारे सभासद सहभागी होऊ शकतील. VC/ OAVM द्वारे होणाऱ्या या एजीएम येथे सभासदांद्वारे प्रतिनिधी नियुक्तीची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

**VC/ OAVM द्वारे २७ व्या एजीएमला उपस्थित राहण्याच्या लिंक्स**

| | |
|---|---|
| नॅशनल सिक्युरिटिज डिपॉजिटरी लिमिटेड (NSDL) पोर्टलद्वारे सर्व सभासदांसाठी | https://www.evoting.nsdl.com |
| NSDL सह डिमॅट स्वरूपामध्ये भागधारण करणाऱ्या सभासदांसाठी | https://eservices.nsdl.com/ https://www.evoting.nsdl.com/ |
| CDSL सह डिमॅट स्वरूपामध्ये भागधारण करणाऱ्या सभासदांसाठी | https://www.cdslindia.com https://web.cdslindia.com/myeasitoken/Home/Login |

एजीएमच्या सूचनेमध्ये २७ व्या एजीएमला उपस्थित राहण्याच्या तपशिलवार सूचना पुरविण्यात आलेल्या आहेत.

इलेक्ट्रॉनिक पर्यायाद्वारे आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी एकात्मिक वार्षिक अहवाल आणि २७ व्या एजीएमची सूचना पाठविण्याची पूर्तता.

लागू एमएसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांसह अनुपालनामध्ये ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते १९ जून २०२६ रोजी कंपनी/कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी म्हणजेच कफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड (RTA)/डिपॉझिटरी पार्टिसिपंटसह (DPs) नोंदणीकृत आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक पर्यायाद्वारे ३० जून २०२६ रोजी ३१ मार्च २०२६ अखेर आर्थिक वर्षासाठीच्या एकात्मिक वार्षिक अहवालासह २७ वी एजीएमची सूचना पाठविण्याचे काम पूर्ण झाले आहे. ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल आयडी कंपनी/डीपी/आरटीएसह नोंदणीकृत केलेले नाहीत अशा सभासदांनासुद्धा आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी एकात्मिक वार्षिक अहवाल प्राप्त करण्यासाठी वेब लिंक आणि जलद प्रतिसाद (QR) कोडच्या प्रत्यक्ष प्रती पुरविण्यात आलेल्या आहेत.

२७ व्या एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष (FY) २०२५-२६ साठीचा एकात्मिक वार्षिक अहवाल कंपनीचे संकेतस्थळ https://www.mahindralifespaces.com/investor-center/?category=annual-reports येथे अपलोड करण्यात आलेला आहे आणि स्टॉक एक्स्चेंजचे संकेतस्थळ म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड येथे https://www.bseindia.com आणि https://www.nseindia.com वर अनुक्रमे आणि NSDL चे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com येथून सुद्धा प्राप्त करता येईल. २७ व्या एजीएमची सूचना आणि एकात्मिक वार्षिक अहवालाच्या प्रत्यक्ष प्रती अशा सभासदांना पाठविण्यात येतील ज्यांनी या पाठविण्याची विनंती केली आहे.

**इलेक्ट्रॉनिकली मतदान करण्याच्या पद्धती**

कायद्याच्या कलम १०८ च्या तरतुदीसह अनुपालनामध्ये लिस्टिंग रेग्युलेशन्सचे नियमन ४४ आणि कंपनीज (मॅनेजमेंट अँड अॅडमिनिस्ट्रेशन) रूल्स २०१४ चा नियम २० सह वाचावा, एजीएमच्या सूचनेमध्ये स्थापित २७ व्या एजीएम येथे व्यवहार करण्यासाठी प्रस्तावित सर्व ठरावांवर त्यांच्या सभासदांना मतदान करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान सुविधा देण्याचा कंपनीस आनंद होत आहे.

सभासद नॅशनल सिक्युरिटिज डिपॉझिटरी लिमिटेड (रिमोट ई-मतदान) आणि त्याचबरोबर २७ व्या एजीएम येथे ई-मतदानाद्वारे पुरविण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्लॅटफॉर्मद्वारे त्यांचे मतदान करू शकतील. एजीएमच्या सूचनेमधील सूचनांमध्ये लॉगइन आणि रिमोट ई-मतदान करण्याची तपशिलवार प्रक्रिया पुरविण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| रिमोट ई-मतदान सुरूवात | सोमवार, २० जुलै २०२६ रोजी सकाळी ९.०० वा. (भाप्रवे) |
| रिमोट ई-मतदान समाप्ती | बुधवार, २२ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा. (भाप्रवे) |

त्यानंतर एसडीएलद्वारे रिमोट ई-मतदान सुविधा तात्काळ बंद करण्यात येईल आणि वरील दिनांक व वेळेनंतर रिमोट ई-मतदानास परवानगी दिली जाणार नाही. कट ऑफ दिनांकारोजी सभासद नसलेल्या व्यक्तीने ही सूचना केवळ माहितीच्या हेतूसाठी पाहावी.

एजीएमला उपस्थित राहणारे सभासद, ज्यांनी रिमोट ई-मतदानाद्वारे अगोदर मतदान केलेले नाही आणि ज्यांना तसे करण्यास इतर कोणत्याही प्रकारे मनाई नाही, ते २७ व्या एजीएमदरम्यान त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करू शकतील. रिमोट ई-मतदानाद्वारे मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही सभासद एजीएममध्ये सहभागी होऊ शकतील, परंतु त्यांना २७ व्या एजीएमदरम्यान पुन्हा मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही. शुक्रवार, १७ जुलै, २०२६ (कट ऑफ डेट) रोजी डिपॉझिटरीद्वारे ठेवण्यात आलेल्या लाभार्थी ओनर्सच्या यादीमध्ये किंवा सभासदांच्या रजिस्टरमध्ये ज्या व्यक्तींची नावे रेकॉर्ड असतील त्या व्यक्ती एजीएम दरम्यान रिमोट ई-मतदान किंवा ई-मतदानाद्वारे मतदान करण्यास पात्र राहतील. सभासदांचे मतदानाचे हक्क, कट ऑफ दिनांकारोजी कंपनीच्या पेडअप समभाग भांडवलामधील त्यांच्या भागांच्या प्रमाणात राहतील.

जर, डिमॅट स्वरूपात सिक्युरिटीज धारण करणारे वैयक्तिक भागधारक, जे सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे भाग खरेदी करतात आणि कंपनीचे सभासद होतात, आणि कट-ऑफ दिनांकारोजी भाग धारण करतात, ते २७ व्या एजीएममध्ये मतदान करण्यासाठी आणि उपस्थित राहण्यासाठी, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केलेल्या पायऱ्यांचे पालन करावे. प्रत्यक्ष स्वरूपात भागधारण करणारी कोणतीही व्यक्ती आणि बिगर-वैयक्तिक भागधारक, जे ई-मेलद्वारे सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे भाग खरेदी करतात आणि कंपनीचे सभासद बनतात, आणि कट-ऑफ दिनांकारोजी भागधारण करतात, ते evoting@nsdl.com वर investor.mldl@mahindra.com यांना सीसी (cc) सह विनंती पाठवून लॉगइन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतील. तथापि, जर सभासद रिमोट ई-मतदानसाठी NSDL सह अगोदरच नोंदणीकृत असल्यास, तो त्याचा/तिचा सध्याचा यूजर आयडी आणि पासवर्ड ई-मतदानासाठी वापरू शकेल.

एजीएमच्या सूचनेसोबतच्या सूचनांमध्ये पुरविण्यात आलेल्या एजीएममध्ये सहभाग आणि रिमोट ई-मतदान आणि ई-मतदानाच्या पद्धतीसाठी तपशिलवार सूचना पाहण्याची विनंती सभासदांना करण्यात येत आहे.

**२७ व्या एजीएममध्ये ई-मतदान आणि सहभागासाठी मदत**

रिमोट ई-मतदान आणि व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएमला उपस्थित राहण्यासंबंधी कोणत्याही शंका किंवा तक्रारी असल्यास, तुम्ही www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले भागधारकांसाठीचे ई-मतदान यूजर मॅन्युअल आणि वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) पाहू शकता किंवा NSDL यांच्याकडे evoting@nsdl.com वर ईमेलद्वारे संपर्क साधावा किंवा 022-4886 7000 वर कॉल करावा किंवा श्रीमती प्राजक्ता पावले, उपव्यवस्थापक, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, ३ रा मजला, नमन चेंबर्स, प्लॉट सी-३२, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र - ४०००५१ येथे संपर्क साधावा.

**सभासदांना विनंती, केवायसी आणि नामनिर्देशन तपशील नोंदणी/अद्ययावत करा आणि दावा न केलेल्या लाभांशावर दावा करा**

सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या डिपॉजिटरी पार्टिसिपंटसह ठेवण्यात आलेल्या डिमॅट खात्यामध्ये नामांकन तपशील आणि त्यांचे केवासी तपशील (पॅन, पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल, बँक खाते) नोंदणीकृत/अद्ययावत करावेत.

तसेच सभासदांना विनंती करण्यात येते की, मागील आर्थिक वर्षांसाठी जाहीर केलेला लाभांश, जर दावा केला नसल्यास, तो रोख स्वरूपात घेण्यासाठी आणि दावा करण्यासाठी, कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी कफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (RTA) यांना einward.ris@kfintech.com या ई-मेल पत्त्यावर विनंती पाठवावी.

आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी, बाकी लाभांशाचा दावा करण्यासाठी काही असल्यास, देय दिनांक २७ ऑगस्ट, २०२६ आहे. सर्व संबंधित सभासदांना विनंती करण्यात येते की, एजीएमच्या सूचनमध्ये पुरविण्यात आलेल्या तपशिलानुसार देय दिनांकापूर्वी दाव्यांची प्रक्रिया करण्यासाठी, त्यांनी आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी दावा न केलेला लाभांश किंवा बाकी लाभांशाच्या दाव्यासाठी विनंतीसह १० ऑगस्ट २०२६ पूर्वी कंपनीला किंवा कंपनीचे आरटीए यांना अर्ज करावा.

महिंद्रा लाईफस्पेस डेव्हलपर्स लिमिटेडकरिता
सही/-
बिजल परमार
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सभासदत्व क्र. - ACS 32339

ठिकाण : मुंबई
दिनांक : १ जुलै २०२६